## नि.क्र.१८ खालील आदेश

अर्जदाराने सदरचा अर्ज हा अनुसया त्रिंबक मेनकुदळे हिला सदरच्या प्रकरणात अर्जदार क्र.२ म्हणून सामिल करण्याकरीता सादर केला आहे. अर्जदाराच्या वकीलांनी असा युक्तिवाद केला की, त्रिंबक बापूराव मेनकुदळे हा दिनांक ०१.०४.२०१२ रोजी मरण पावला. त्याला अर्जदार अनिल आणि अनुसया त्रिंबक मेनकुदळे हे दोन वारस आहेत. अर्जदार अनिल हा त्रिंबकचा मुलगा आहे व अनुसया ही त्याची पत्नी आहे. अर्जदार अनिलने सदरचा अर्ज हा शासनाने जमा केलेला मोबदला उचलण्याकरीता सादर केला आहे. अर्जदाराने सदरच्या प्रकरणात त्याच्या आईला पक्षकार म्हणून सामिल केले नाही कारण ती म्हातारी असून आजारी आहे. अर्जदाराने तो व त्याची आई त्रिंबकचे वारस असल्याबाबतचे वारसा प्रमाणपत्र दिवाणी न्यायाधीश क.स्तर, अहमदपूर या न्यायालयातून घेतले आहे. पुढे त्यांनी असा युक्तीवाद केला की, अनुसया हिला सदरच्या प्रकरणात चुकीने पक्षकार म्हणून सामिल करण्याचे राहून गेल्यामुळे तिला सदरच्या प्रकरणात अर्जदार क्र.२ म्हणून सामिल करण्याची परवानगी देण्यात यावी. सदरच्या प्रकरणात अनुसया हिला अर्जदार क्र.२ म्हणून सामिल केल्यास गैरअर्जदारांचे कोणतेही नुकसान होणार नाही. पुढे त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज मंजूर करण्यात यावा.

२) गैरअर्जदार क्र.१ व २ यांच्या वतीने त्यांच्या वकिलांनी सदरच्या अर्जावर त्यांचा कोणताही आक्षेप नाही असे उत्तर सादर केले आहे. गैरअर्जदार क्र.३ यांचा वारंवार पुकारा केला असता ते गैरहजर होते. त्यांनी सदरच्या अर्जावर त्यांचे उत्तर सादर केले नाही.

३) अर्जदाराच्या अर्जाचे अवलोकन केले असता त्रिंबक मेनकुदळे याला अनिल नांवाचा मुलगा व अनुसया नांवाची पत्नी होती ही बाब दिसून येते. अर्जदाराने निशाणी क्र.१७ अन्वये किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३२/२०१५ यात दिलेल्या वारसा प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत सादर केली आहे. सदरच्या प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता, त्यावरुन अनुसया त्रिंबक मेनकुदळे ही त्रिंबक बापूराव मेनकुदळे यांची पत्नी असून अनिल त्रिंबक मेनकुदळे हा त्यांचा मुलगा आहे ही बाब दिसून येते. त्यामुळे अनुसया त्रिंबक मेनकुदळे हिला सदरच्या प्रकरणात अर्जदार क्र.२ म्हणून

समाविष्ट केल्यास अर्जाचे कोणतेही स्वरूप बदलत नाही. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. अर्जदाराला असे आदेशित करण्यात येते की, त्याने सदरची दुरुस्ती ही दि.०५/०९/२०१९ रोजी करावी.

अहमदपुर.
दिनांक : २७.०८.२०१९.

(अ.रा.सुर्वे)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
अहमदपूर.

Certified that PDF copy of Order supra is word-to-word identical to the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S.B. Harnale |
| Dictated on | : | 27.08.2019 |
| Checked on | : | 27.08.2019 |
| Signed on | : | 27.08.2019 |
| Uploaded on | : | 27.08.2019 |